# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २५.०७.२०२६ शनिवार**

**गुन्हयातील अटक व अभिलेखावरिल गुन्हेगारांचा आदान–प्रदान कार्यक्रम संपन्न :–**

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनातून दिनांक २५.०७.२०२६ चे १०.०० वा., नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध १७ पोलीस ठाणे येथे अटक व गुन्हे अभिलेखावरील सक्रीय असे एकूण **७६ आरोपींचे** आदान–प्रदान हे पोलीस नियंत्रण कक्ष परिसरातील मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) कार्यालय येथे मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी यांचे उपस्थीतीत पार पडले. आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत, याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील एकूण १५ अधिकारी व ५१ अंमलदार हे आरोपीसंह हजर होते.

मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली बाबत उपस्थीत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समजावुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचे डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा सुचना दिल्या.

मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) यांचे उपस्थीतीत आदान–प्रदानाची प्रक्रीया सुरळीतपणे व नियमाप्रमाणे पार पडली, कोणतीही अनुचित घटना घडली नाही.





## (कामगिरी)

## १) जरीपटका पोलीसांची कामगिरी :— घरफोडी करणाऱ्या पाहीजे आरोपीस अटक. ०३ गुन्हे उघडकीस.

पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत प्लॉट क्र. ३०, स्नेहदीप कॉलनी, हनुमान मंदीरसमोर, जरीपटका येथे राहणारे फिर्यादी स्नेहल उल्हास शेंडे वय ३६ वर्ष हे पंजाब नॅशनल बॅक, मुंबई येथे नेमणूकीस असल्याने ते मुंबई येथे हल्ली मुक्कामी असतात. त्यांचे वडील, पत्नी व मुले हे जरीपटका येथील घरी राहतात. फिर्यादीचे मुलांना सुटया असल्याने फिर्यादीची पत्नी, वडील व मुले हे आपले राहते घराला कुलुप लावुन फिर्यादी यांचेकडे मुंबई येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने दिनांक २२.०६.२०२६ चे ०२.५८ वा. ते ०३.१७ वा. चे दरम्यान, फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, घरातील रोख ५०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने आणि मोबाईल फोन असा एकुण किंमती ३,८२,२५०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे सीसीटिव्ही फुटेजची पाहणी केली असता फिर्यादी यांना दिसून आले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपीस निष्पन्न केले व आरोपी नामे सुमित गणपत मेश्राम, वय १९ वर्षे रा. नारा गाव, हनुमान मंदीरजवळ, जरीपटका, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा त्याचे एका साथीदार पाहिजे आरोपी याचे सह संगणमताने केल्याची कबुली दिली होती. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु, एक पल्सर मोटार सायकल, एक मोबाईल फोन व सोन्याचे दागिने असा एकुण १,४५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.

जरीपटका पोलीसांनी गुन्ह्यातील पाहीजे आरोपी नामे धृव राजेश बिरबल, वय २० वर्षे, रा. टिमकी, तिनखंबा चौक, शाहुचे घरी किरायाने, याचेवर पाळत ठेवुन, त्यास एका पांढऱ्या रंगाचे ॲक्सेस गाडीसह ठवरे कॉलोनी येथुन ताब्यात घेवुन, नमुद गुन्ह्यात अटक केली. आरोपीस त्याचेजवळील ॲक्सेस मोपेड क्र. एम.एच. ४० बि.वाय ९७१३ बाबत विचारणा केली असता, त्याने ती पोलीस ठाणे सावनेर, नागपुर ग्रामीण हद्दीतुन चोरी केल्याची कबुली दिली. तसेच आरोपीने पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीतुन ग्रे रंगाची ॲक्टीवा क्र. एम.एच. ३१ एफटी ८९७५ व पो.ठाणे वाठोडा हद्दीतुन स्प्लेंडर प्रो दुचाकी क्र. एम.एच. ४९ झेड ३७२१ चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन वरील तिन्हीही वाहने तसेच, घरफोडीचे गुन्ह्यातील सोन्याचे दागिणे असा एकुण ३,६९,१५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. सत्यवीर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिल ताकसांडे, पोनि. गुन्हे प्रमोद चौधरी, सपोनि. आशिष मोरघडे, पोहवा. रमेश यादव, पोअं. मंगेश दोनाडकर, पंकज वरकड, राकेश सिंग व नितेश नागपुरे यांनी केली.



**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पथक पोलीसांची कामगीरी :— अवैध दारूसाठा जप्त.**

दिनांक २५.०७.२०२६ चे ०९.२० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, प्लॉट नं. ७, धम्मानंद नगर, एनआयटी गार्डन जवळ, पिवळी नदी, यशोधरानगर, नागपुर येथे राहणारा ईसम नामे आशिष अशोक खोब्रागडे, वय ३५ वर्षे याचे राहते घरी सापळा लावुन रेड कार्यवाही केली असता, त्याचे राहते घरी देशी दारू भिंगरी संत्रा च्या ९० मि.ली. च्या ३७० नग बॉटल अवैद्यरित्या दारूसाठा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन देशी दारू किंमती १८,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा अवैद्यरित्या दारूचा साठा विक्री करीता बाळगतांना मिळुन आल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपीस मुद्देमालासह यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नविन कामठी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक २५.०७.२०२६ चे ११.४५ वा. ते १२.१५ वा. चे दरम्यान, नविन कामठीचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, बादल नावाचा हद्यपार इसम हा कामठी ते नागपुर कडे जाणाऱ्या रोडवरील गुड्डु चाय टपरी, ईस्माईलपुरा, कामठी येथे उभा आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन तेथे जावुन पाहणी केली असता, एक ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने बादल संजय संतापे, वय २८ वर्ष रा. अनाज गोडावुन जवळ, वित्तुबाबा नगर, कामठी, नागपूर असे सांगितले. त्यास पोलीस ठाणे येथुन आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. ३२/२०२६ दिनांक ०२.०१.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी नितेश नवघडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे

आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कळमना :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २४.०७.२०२६ चे २०.३० वा. चे सुमाराय, कळमना पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, चिखली वस्ती, लकी गृह उद्योग जवळ एक इसम हातात शस्त्र घेऊन धुमाकुळ घालत आहे. अशा माहितीवरुन घटनास्थळी जाऊन, तेथे पाहणी केली असता, प्राप्त वर्णनाचा इसम शस्त्रासह धुमाकुळ घालतांना दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेऊन, निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विपीन उर्फ गुड्डु रमेश आठनेरे, वय ३८ वर्षे रा. गजानन मंदीर जवळ, चिखली, कळमना, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकू किंमती ५००/—रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने हातात चाकु घेवुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने वेळीच ताब्यात घेतले. आरोपीने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोहवा. प्रमोद कंगाले यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमना येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे नंदनवन :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी सचिन मनोहर येनकर, वय ४७ वर्षे, रा. प्लॉट क्र. २३, हिवरी नगर, गिता मंदीर जवळ, नंदनवन, नागपूर यांचे श्रीकृष्ण ऑटोमोबाईल नावाने मोटारसायकल रिपेरिंगचा लकडगंज येथे व्यवसाय आहे. त्यांचे व्यवसायाचे बॅक ऑफ बडोदा येथे खाते आहे. दिनांक २३.०७.२०२६ चे १७.४५ वा. ते २१.३० वा. चे दरम्यान फिर्यादीचे मोबाईलवर अज्ञात मोबाईल क्रमांक धारकाने मॅसेज पाठविले. मॅसेजेस हे ओटीपी व ई—चालान संदर्भातील होते. अधिक प्रमाणात मॅसेजेस प्राप्त झाल्याने फिर्यादी यांनी बॅकेचे खाते तपासले असता, त्यांना मोठ्या प्रमाणात रक्कम कपात झाल्याचे दिसुन आले. फिर्यादी यांनी मोबाईल तपासनी केली असता, ई—चालानचे नावाखाली संशयास्पद एपिके फाईल डाऊनलोड झाल्याचे त्यांना समजले. अज्ञात मोबाईल धारकाने फिर्यादीचे मोबाईल वर एपिके फाईल द्वारे अनधिकृतपणे त्यांचे मोबाईलमध्ये प्रवेश (मोबाइल हॅक) करून, बॅक खात्यातुन युपिआय व्यवहाराद्वारे वेळोवेळी एकुण ९,६९,०७९/—रू. अपहारीत करून, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. दिगांबर बोरकर ९६३७६३२१२८ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(४) भा.न्या.सं.,सहकलम ६६(क), ६६(ड) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे कोराडी :—** कु. अंकीता संजु झारीया, वय १९ वर्षे, रा. लखनादौन, जि. शिवनी. (म.प्र.), ह.मु. रिकॉन कॉन्स्टन्ट कंपनी, कवडा रोड, कोराडी, नागपूर ही दिनांक २३.०७.२०२६ चे ०७.०० वा. पासुन, पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट ३ इंच, केस— काळे लांब, डोळे—काळे, अंगात— हिरव्या रंगाची सलवार व पांढरी लॅगीन घातलेले आहे. भाषा— हिंदी बोलते.



अंकीता

स्वा/–

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.